I.O. प्रत
११

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड — **P.S.(ठाणे):** केज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0018 — **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/01/2026 00:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 24/12/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/01/2026
   **Time From (वेळेपासून):** 11:46 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/01/2026 — **Time (वेळ):** 23:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 045
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/01/2026 23:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर — **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती केज ,केज

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विजय हनुमंत वगरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धाराशिव,केज,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धाराशिव,केज,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7722011245

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव प्रताप खेडकर | | | 1. तरनळी ,काळुचीवाडी,केज , केज,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 70,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 70,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

70,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 13 /01/2026

मी विजय हनुमंत वगरे, वय 39वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव मो.क्र.7722011245.
समक्ष केज पोलीस ठाणे जिल्हा बीड येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 22/12/2025 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो धाराशिव येथे कर्तव्यावर कार्यालयात हजर असताना तक्रारदार नामे श्री. शिवाजी शंभु मोहिते, वय 60 वर्ष, व्यवसाय - शेती/ उपसरपंच, रा. तरनळी ता. केज जि. बीड, मोबाईल नंबर 7057422692 यांनी माझेशी संपर्क साधुन त्यांना शासकीय जलसिंचन विहीर मंजुर करुन देण्यासाठी लोकसेवक लाच मागत असल्याचे कळविले. त्यावरुन आम्ही मा.पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांना सदर तक्रारीबाबत कळविले व त्यांचे तोंडी परवानगी घेवुन पुढील सापळा कार्यवाहीस सुरुवात केली. त्यावेळी मी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, धाराशिव यांना दोन शासकीय कर्मचारी/ अधिकारी पंच म्हणुन मिळणे बाबत पत्र दिले त्यावरुन त्यांनी त्यांचे कार्यालयातील दोन कर्मचारी पंच म्हणुन आमचे कार्यालयात उपलब्ध करुन दिले. त्यांची नावे 1) श्री. महेश जर्नादन सोनटक्के, वय 54 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पद - पद- वरिष्ठ सहाय्यक, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव रा. माणीक चौक, प्रसाद कॉलनी, धाराशिव ता.जि.धाराशिव 2) श्री. गणेश बापू काकडे, वय 29 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद- वरिष्ठ सहाय्यक, ( लेखा ), बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव रा. देशपांडे स्टँड जवळ, धाराशिव ता.जि.धाराशिव असे असल्याचे सांगितले.
दिनांक 23.12.2025 रोजी पंच हे सकाळी 09:00 वाजता ला.प्र.वि.कार्यालय धाराशिव येथे आले असता त्यांची ओळख करुन घेतली व आपली ओळख करुन दिली. तसेच सापळा पथकातील अमंलदार पोहेकॉ / 1272 जाधव, पोशि / 1705 तावसकर व पोशि / 960 काझी असे सापळा कारवाईकामी आवश्यक असणारे सर्व साहीत्यासह शासकीय वाहनाने 09:30 वाजता रवाना झालो.त्यानंतर 11:00 वाजताचे सुमारास तक्रारदार व त्यांचे इतर दोन सहकारी यांचेसह ते केज येथे आम्हाला भेटण्यासाठी आले असता त्यांची व पंचाची व पथकाची ओळख करुन देण्यात आली. त्यावेळी पंचासमक्ष तक्रारदार यांची तक्रार घेतली असता त्यांनी तक्रार दिली ती पुढीलप्रमाणे आहे मी शिवाजी शंभु मोहिते, वय 60 वर्ष, व्यवसाय - शेती/ उपसरपंच, रा. तरनळी ता. केज जि. बीड, मोबाईल नंबर 7057422692. मी काल दिनांक 22/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धाराशिव येथे संपर्क साधुन एक लोकसेवक माझे कामासाठी माझेकडे लाचेची मागणी करत असुन आपण केज येथे येवुन माझी तक्रार नोंदवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत कळविले होते. त्यावरुन आज दिनांक 23/12/2025 रोजी 11:00 वाजता चे सुमारास पोलीस निरीक्षक विजय वगरे, ला.प्र.वि.धाराशिव यांचे पथक व दोन पंच हे केज येथे आले मी त्यांची केज येथे भेट घेतली. त्यानंतर त्यांनी केज - कळंब जाणारे रोडचे कडेला सुरक्षीत ठिकाणी माझी तक्रार घेतली त्यात मी पुढील प्रमाणे हकीकत सांगितली, मी आपले समक्ष हजर राहून तक्रार देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन कुटूंबासोबत राहतो व शेती करुन कुटूंबाची उपजिवीका भागवितो. मी माझे तरनळी ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायत सदस्य असुन मी सध्या उपसरपंच म्हणुन गावचा कारभार पाहतो. तसेच आमचे गावात श्री.महादेव प्रताप खेडकर हे सरपंच म्हणुन काम पाहतात.
मौजे तरनळी येथे गट क्रमांक 191 मध्ये माझी शेत जमीन आहे. सदर जमिनीमध्ये शासनाचे एम.आर.ई.जी.एस. या योजने अंतर्गत जलसिंचन विहीर मंजुर करण्यासाठी मी ग्रामपंचायत कार्यालय, तरनळी येथे अर्ज व इतर कागदपत्रे दाखल केले आहेत तसेच माझे सोबत माझे गावातील जलसिंचन विहीर लाभधारक 1) रमेश माणिक मोहिते 2) अंगद मारुती माने 3) महादेव सुर्यकांत नखाते सर्व रा. तरनळी ता.केज जि.बीड यांनी पण जलसिंचन विहीर मंजुर करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय तरनळी येथे अर्ज दाखल केले आहेत. सदर अर्जावर ग्रामसेवक यांनी सहया करुन ते सर्व अर्ज पुढे माझ्याकडे सरपंच यांची सही घेण्यासाठी दिले. मी सर्व अर्जावर गावाचे सरपंच महादेव प्रताप

खेडकर यांची सही घेण्यासाठी मागील चार दिवसापूर्वी गेलो असता सरपंच यांनी स्वता:कडे अर्ज जमा करुन घेतले व मला म्हणाले की, जलसिंचन विहीरीच्या चार अर्जावर माझ्या सहया करुन ते बीडीओ व इतर अधिकारी / कर्मचारी यांचेकडून मंजुर करुन घेतो. त्यासाठी तुम्ही माझेकडे प्रत्येकी 25,000/- रुपये खर्च म्हणुन दयावे लागतील तरच तुमची व इतर तिघांच्या विहीरी मंजुर करुन घेतो असे ते म्हणाले. तसेच त्यांनी मला सांगितले की, मी इतर तिघांना पैसे मागणार नाही त्यांचे पैसे तुम्ही गोळा करा व ते माझेकडे आनुन दया. त्यावर मी त्यांना नाविलाजास्तव ठिक आहे असे म्हणून तेथुन निघुन आलो. त्यानंतर माझे लक्षात आले की, माझी व इतर तिघांची शेतातील जलसिंचन विहीरीच्या अर्जावर त्यांच्या सहया करुन ते बीडीओ व इतर अधिकारी / कर्मचारी यांचेकडून मंजुर करण्यासाठी सरपंच महादेव खेडकर हे आमच्याकडे खर्च म्हणुन प्रत्येकी मागत असलेले 25,000/- रुपये असे एकुण 1,00,000/- रुपये हे कोणतीही शासकीय फि नसुन ती लाचच आहे मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. सरपंच खेडकर व माझ्यामध्ये कोणताही पैसे देण्या- घेण्याचा आर्थीक व्यवहार नाही. तसेच आमच्यात कोणतीही आप दुष्मनी, भांडण नाही. आज रोजी पंचायत समिती केज येथील परीसरात सरपंच खेडकर राहत असलेल्या रुमवर जावुन सरपंच खेडकर यांना भेटुन माझे व इतर तिघांचे जलसिंचन विहीरीचे कामाबाबत बोलणार आहे. त्यावेळी सरपंच खेडकर यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन त्यांनी स्वता: किंवा इतरामार्फत लाच रक्कम स्वीकारल्यास त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. मी सोबत माझे व इतर तिघाचे विहीरीचे इस्टीमेट टी.एस.सादर करीत आहे.माझी वरील तक्रार ही माझे सांगणेप्रमाणे लिहीली असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर असुन मला वाचुन दाखविण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले त्यावरुन दिनांक 23.12.2025 रोजी लोकसेवक खेडकर हे कोठे आहेत हे जानुन घेण्याकरीता तक्रारदार मोहीते यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 7057422692 यावरुन सरपंच खेडकर याचे मोबाईल क्रमांक 9146881616 यावर संपर्क साधला असता ते बाहेर गावी असल्याचे व आज रोजी त्याची भेट होणार नसल्याचे सरपंच यांनी सांगितले तसेच त्यांनी यांना दिनांक 24.12.2025 रोजी भेटण्यास कळविले. त्यानंतर आम्ही दिनांक 24.12.2025 रोजी केज येथे जावुन तक्रारदार व पंच गणेश काकडे यांना लोकसेवक खेडकर हे लाच मागणी करतात का यांची पडताळणी करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालुकरुन ते तक्रारदार यांना लावुन पाठविले असता लोकसेवक सरपंच खेडकर यांनी तक्रारदार व इतर तिघांचे जलसिंचन विहीरीचे प्रस्तावर स्वत:ची सही करुन बीडीओ व इतर अधिकारी यांचेकडून जलसिंचन विहीरी मंजुर करुन आणण्यासाठी खर्च येइल असे सांगुन तक्रारदार यांचेकडे इतर तिघांचे प्रत्येकी 20,000/- रुपये व तक्रारदार यांचे 10,000/- रुपये असे एकुण 70,000/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष करुन लाच रक्कम त्यांनी सांगितल्यावर घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले त्याबाबत लाचपडताळणी पंचनामा सविस्तर करण्यात आला आहे. तक्रारदार मोहिते यांना लोकसेवक खेडकर यांनी लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगतील त्यावेळी सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले आहे.

त्यानंतर आम्ही सापळा कारवाई करण्याकरीता दि.01.01.2026 रोजी केज येथे आलो. तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 500 रुपये दराच्या 140 नोटा असे एकुण 70,000/- रुपये आणले आम्ही सदर नोटांचे नंबर हे पंच सोनटक्के यांचे मदतीने एका कोऱ्या कागदावर घेतल्या. त्यानंतर तक्रारदार यांना पंचासोबत लाच रक्कम 70,000 /- रुपये घेवुन सरपंचाचे मागणीप्रमाणे त्यांना देण्यासाठी पंचायत समिती केज येथे पाठवले असता सरपंच यांनी लाच रक्कम न स्विकारता तक्रारदार यांना सांगितले की, सदर चे पैसे हे तुमच्याकडे ठेवा व मी तुम्हाला सांगितल्यानंतर तुमचे आणि इतर तिघांचे असे एकुण 70,000/- रुपये घेवुन या मी तुम्हाला आदल्या दिवशी फोन करतो असे त्यांनी सांगितल्यानंतर आम्ही सापळा करवाई स्थगीत केली सदरबाबतचा सापळा करवाई स्थगिती पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर आज दि.13.01.2026 रोजी सरपंच खेडकर यांनी तक्रारदार मोहिते यांना लाच रक्कम घेवुन बोलावल्याचे तक्रारदार मोहिते यांनी आम्हाला कळविलेवरुन आम्ही केज येथे आलो तेथे त्यानंतर पंच गणेश काकडे यांना तक्रारदार मोहिते यांचे सोबत जाण्याच्या व तक्रारदार यांना इतर उपयुक्त सुचना दिल्यानंतर ऑथ्रसीन पावडर लावलेली लाच रक्कम 70,000/- रुपये हि तक्रारदार यांचे छाटन बनीयानच्या खिस्यामध्ये ठेवुन त्या उजव्या हाताने लोकसेवक खेडकर यांना देवुन त्यांनी जर ते घेतल्या तर डाव्या हाताने त्यांचे डोक्यावरील टोपी काढुन खाली घेण्याबाबतचा सुचक इशारा करावा असे तक्रारदार यांना सांगितले. सुचना दिल्या त्यानंतर पंच क्रमांक 01 काकडे यांचे समक्ष तक्रारदार यांच्या छाटन बनीयानचे आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन कापडी लहान पिशवीमध्ये ठेवुन काटा पिनने लावण्यात आला पंच क्र 2 सोनटक्के यांना आजुबाजुला राहुन सर्व सापळा करवाईमध्ये होणारे घडामोडीवर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 01 काकडे यांना आलोसे सरपंच यांचेकडे पाठवण्यात आले त्यांचे मागे सापळा कारवाईतील अधिकारी व अंमलदार हे रवाना झाले थोडयावेळाने तक्रारदार मोहिते व सरपंच खेडकर यांची वकीलवाडी , केज या गल्लीमध्ये खेडकर यांचे रुमवर भेट झाली तक्रारदार

मोहिते यांनी सरपंच खेडकर यांचे रुमचे खाली येवुन त्याचे डावे हाताने त्यांचे डोक्यावरील टोपी खाली घेवुन लाच रक्कम लोकसेवक यांनी स्विकारल्याबाबत इशारा दिला त्यानंतर सापळा पथकाने सरपंच खेडकर यांना त्यांचे भाडे तत्वावर राहत असलेल्या रुममधुन ताब्यात घेतले. त्यांचे रुममधील टेबल वरुन 500/- रुपये दराच्या 140 चलनी नोटा जप्त करण्यात आल्या. सदर नोटा यांचे नंबर पंच क्रमांक 01 काकडे व पंच क्रमाक 02 सोनटक्के यांनी खात्री करुन घेतले त्यानंतर सदर नोटा हया पंच क्रमांक 02 सोनटक्के यांचे ताब्यात देण्यात आल्या घटनास्थळावरली सापळा करवाई पूर्णकरुन आम्ही पुढील कारवाई करण्यासाठी केज पोलीस ठाणे येथे आलो.सदर सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
तरी लोकसेवक महादेव प्रताप खेडकर , वय -35 वर्षे , सरपंच (तरनळी)रा . तरनळी ता.केज जि.बीड मुळ गाव - काळुचीवाडी ता.केज जि.बीड यांनी तक्रारदार मोहिते यांचे व गावातील इतर तिघांची मौजे तरनळी येथील शेत जमीनीमधील शासनाचे एम.आर.ई.जी.एस. या योजने अंतर्गत जलसिंचन विहीर मंजुर करण्यासाठीचे प्रस्तावर सही करुन ती बिडीओ व इतर अधिकारी कर्मचारी यांचेकडून मंजुर करुन घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडून 10,000/- रुपये व इतर तिघांचे प्रत्येकी 20,000/- असे एकुण 70,000/- रुपयाची पंचासमक्ष लाचेची मागणी करुन स्विकारल्यामुळे माझी त्यांचे विरुध्द भ्रष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलम 7,7अ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Swapnil Kacharu Unawane(I (Inspector)) / 15101000402SKM8401C **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Swapnil Kacharu Un
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402SKM8401

पोलीस ठाणे अंमलदार
पद :- मपोह ब.नं.:- 1794
पोलीस ठाणे, केज.